महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 25 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 241 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कमी पट संख्येच्या शाळा धोक्यात ?

## ग्रामीण भागातील जि.प. च्या शाळा संकटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्यात येणार नाहीत, अशी ग्वाही सरकारकडून वारंवार देण्यात येत असली आणि शाळा बंद करण्याचा निर्णय झालेला नसल्याचे खुद्द उच्च न्यायालयात सांगण्यात आले असले, तरी राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांवरील गंडांतर पूर्णपणे टळलेले नाही. शाळा बंद करण्याची थेट भूमिका न घेता शिक्षक पद मंजूर न करण्याचा आडमार्ग शासनाने अवलंबल्याचे दिसत आहे.**

राज्यातील शाळांची संचमान्यतेची प्रक्रिया सुरू आहे. संचमान्यता म्हणजे विद्यार्थी संख्येनुसार शाळेत किती शिक्षक असावेत त्यानुसार शिक्षक पदांची मंजुरी. शाळांना संचमान्यतेसाठी तपशील भरण्यास सांगण्यात आले आहे. त्यानुसार सहावी ते आठवीच्या वीसपेक्षा कमी पट असलेल्या शाळांसाठी शिक्षकांचे एकही पद दाखवण्यात आलेले नाही. म्हणजेच अशा शाळांमध्ये शिक्षकांची शून्य पदे मंजूर असतील. त्यामुळे शाळा 'बंद' नाहीत पण शिक्षकही नाहीत असे चित्र निर्माण होणार असून दुर्गम भागांतील शाळांच्या अस्तित्वावर आणि विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकण्याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. कमी पटाच्या शाळा थेट बंद करण्याऐवजी विद्यार्थी आपणहूनच दुरावतील असा नवा मार्ग शासकीय पातळीवरून शोधून काढल्याचे दिसत आहे.

'शाळा बंद करण्याचे किंवा कमी पटाच्या शाळा एकत्र करून समूह शाळा निर्माण करण्याचे ठोस नियोजन नाही', अशा आशयाचे स्पष्टीकरण शासनाने अलीकडेच उच्च न्यायालयात दिले होते. मात्र आता शाळा बंद करण्याऐवजी तेथील शिक्षकांना दुसरीकडे समायोजित करण्याच्या शिक्षण विभागाच्या हालचाली सुरू आहेत. गेल्या वर्षी कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी पद्धतीने शिक्षक घेण्याचा निर्णयही शासनाने नुकताच रद्द केला आहे. त्यामुळे या शाळांमध्ये कंत्राटीही नाही आणि नियमित शिक्षक पदही नाही अशी अवस्था होण्याची शक्यता आहे.

### शासन निर्णयात तफावत

- संचमान्यतेसाठी म्हणजेच विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक पदे मंजूर करण्याबाबत गेल्या वर्षी १४ मार्च रोजी शासन निर्णय जाहीर करण्यात आला.
- त्यात वीसपेक्षा कमी पट असल्यास पहिली ते चौथीसाठी एक कंत्राटी आणि एक नियमित शिक्षक अशी पदे मंजूर करण्यात आली होती. सहावी ते आठवीला वीसपेक्षा कमी पटसंख्येसाठी दोन पदे मंजूर करण्यात आली होती
- मात्र प्रत्यक्षात प्रक्रिया सुरू असताना संकेतस्थळावर सहावी ते आठवीच्या कमी पटाच्या शाळांसाठी शून्य शिक्षक पद मंजूर असल्याचे दिसत असल्याचे शिक्षकांनी सागितले. त्याला शिक्षक विभागातील अधिकाऱ्यांनीही नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दुजोरा दिला आहे.

केवळ नागपूर जिल्ह्याचा विचार केला तरी ९०० पेक्षा अधिक शिक्षक अतिरिक्त ठरतील. शिक्षकांचा प्रश्न नाही. त्यांचे समायोजनही होईल. मात्र, राज्यातील हजारो शाळा बंद होतील आणि प्रामुख्याने खेडोपाड्यातील मुली शाळेपासून दुरावतील.

– विजय कोंबे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती



## थोडक्यात महत्वाचे

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी ठाण्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे : महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे शहरात आयोजित करण्यात आली असून या कार्यक्रमाच्या समारोपास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी उपस्थित असणार आहे. तर या स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी, २७ फेब्रुवारीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे असे ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सांगितले.

### प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या 19 व्या हप्त्याचे वितरण" या दूरदृष्यप्रणालीद्वारे होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमास जिल्हा नियोजन समिती सभागृहात आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, कृषी सहसंचालक अंकुश माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, कृषी विज्ञान केंद्र, मुरबाड चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश जगदाळे, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक अभिषेक पवार आणि योजनेचे लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त प्रातिनिधीक स्वरूपात शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच "agristek" शेतकरी ओळखपत्राचेही वितरण करण्यात आले.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कुंभस्नान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रयागराज येथे कुंभस्नान शिवसेनेच्या मंत्र्यांनीही केले शाही स्नानमहाकुंभाच्या चोख व्यवस्थेबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांचे केले कौतुकप्रयागराज , ता. २४ फेब्रुवारी २०२५उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्नी सौ. लता शिंदे यांच्यासह महाकुंभ मेळाव्यात शाही स्नान केले. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री दादा भुसे आणि मंत्री भरत गोगावले, मंत्री गुलाबराव पाटील यांनीही शाही स्नान केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की महाकुंभ हा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाचे केंद्र आहे. प्रयागराज ही पवित्र भूमी आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा हा संगम आहे. या पवित्र संगमस्थळी स्नान केले की जीवनाचे सार्थक होते, अशी लोकांची श्रद्धा आहे. १४४ वर्षांनंतर होणारा महाकुंभ अद्भुत आहेत. कोट्यवधी लोक येथे येऊन गेलेत मात्र सगळ्यांना समान वागणूक मिळाली. येथे कोणीही लहान मोठे नाही. ५० कोटी लोकांनी कुंभ स्नान केले हा एक विश्वविक्रम आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. प्रयागराज येथील महाकुंभाची व्यवस्था उत्तम केल्याबद्दल उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे शिंदे यांनी कौतुक केले.

# राज्यात आता दरवर्षी महसूल क्रीडा स्पर्धा

## - चंद्रशेखर बावनकुळे

### राज्य शासनाकडून १ कोटीची तरतुद



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
नांदेड दि. २३ फेब्रुवारी

येथे गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये कोकण विभागाने अव्वल राहत जेते पद पटकावले आहे. दुसरा क्रमांक यजमान छत्रपती संभाजी नगरला तर पुणे विभागाला तिसरा क्रमांक मिळाला. रविवारी सायंकाळी झालेल्या समारोप कार्यक्रमात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी महसूल मंत्र्यांनी दरवर्षी ही स्पर्धा घेण्याचे व त्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली.

दोन हजारावर अधिकारी -कर्मचारी क्रीडापटूंचा तीन दिवसांचा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा महोत्सव आज सायंकाळी थाटात संपन्न झाला. वैयक्तिक,सांघिक आणि मिश्र अशा विविध क्रीडा प्रकारामध्ये नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, पुणे ,नाशिक ,कोकण तसेच नोंदणी मुद्रांक व भूमि अभिलेख विभाग अशा एकूण सात विभागांमध्ये 83 क्रीडा प्रकारात लढती झाल्या.

21 तारखेपासून दोन हजार खेळाडू विविध मैदानावर लढत देत होते. तर 21 व 22 तारखेला यशवंत कॉलेज मैदानावर सायंकाळी या सर्व खेळाडूंनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. डोळ्याचे पारणे फेडणारे रंगमंच आणि अतिशय व्यावसायिकतेने सादर केलेली प्रत्येक कलाकृती यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम लक्षवेधी ठरला.सांस्कृतिक स्पर्धेमध्ये नाशिक विभागाने प्रथम, कोकण विभागाने द्वितीय व नागपूर विभागाने तृतीय पुरस्कार मिळवला. या स्पर्धेमध्ये कर्मचाऱ्यांनी केलेले संचलन हे देखील एक उपलब्धी ठरली आहे. यजमान छत्रपती संभाजी नगरने यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक नाशिक तर तृतीय क्रमांक कोकण विभागाने पटकावला.

#### 83 क्रीडा प्रकारात भिडंत

क्रिकेट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, धावणे, चालणे, जलतरण, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बॅडमिंटन,गोळा फेक, थ्रो बॉल, थाळीफेक, भालाफेक, रिंग टेनिस, जलतरण, संचलन अशा 15 क्रीडा प्रकारामध्ये पुरुष, महिला व मिश्र संघ , 45 वर्षांवरील संघ,असे एकूण 82 क्रीडाप्रकार होते. तसेच सांस्कृतिक आयोजन अशा एकूण 83 घटकातून गुणानुक्रमांक देण्यात आले.यामध्ये कोकण विभागाने सर्वाधिक ३४१ गुण मिळवले. तर त्या पाठोपाठ यजमान छत्रपती संभाजी नगरने २२७ गुण मिळवले तर तिसऱ्या क्रमांकावर २१७ गुणांसह पुणे विभाग राहिला.

#### दरवर्षी होणार क्रीडा स्पर्धा

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी संबोधित करताना बारा वर्षानंतर नांदेडमध्ये या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्याचा आनंद व्यक्त केला. मात्र यापुढेही क्रीडा स्पर्धा दरवर्षी घेतली जाईल. यासाठी राज्य शासन एक कोटीची तरतूद करेल अशी घोषणा केली. तसेच नियुक्ती आणि पदोन्नती देताना क्रीडापटूंना अग्रस्थान दिले जाईल अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

### मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी प्रभू पाटील यांची बिनविरोध निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**तुर्भे, ता. २४** : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती कोकण विभागातील उल्हासनगर येथील शेतकरी प्रतिनिधी प्रभू पाटील तर नागपूरचे हुकूमचंद आमधरे यांची बिनविरोध निवड झाली. न्यायालयाच्या आदेशानुसार सोमवारी ही निवडणूक पार पडली.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि उपसभापती ही पदे गेल्या दोन वर्षांपासून रिक्त होती. त्यामुळे बाजार समितीशी निगडित विविध महत्त्वाचे निर्णय रखडल्याने या पदांसाठीची निवडणूक घ्यावी, अशी मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. उच्च न्यायालयाने या प्रकरणात बाजार समितीला दोन्ही पदांची निवडणूक घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मुंबई एपीएमसीतील प्रशासकीय इमारतीत सोमवारी (ता. २४) दुपारी दोन वाजता निवडणूक पार पडली. या वेळी एकनाथ शिंदे यांचे समर्थक प्रभू पाटील यांची निवड एकमताने झाली.



# माणिकराव कोकाटेंना तात्पुरता दिलासा

## अपात्रतेची टांगती तलवार मात्र कायम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका या बनावट दस्तऐवज तयार करून लाटल्या प्रकरणात कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे (Manikrao Kokate) व त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि 50 हजार रुपये दंडाची शिक्षा नाशिक जिल्हा न्यायालयाने (Nashik Court) ठोठावली आहे. यावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहेत. त्यातच शिक्षेला आव्हान देण्यासाठी माणिकराव कोकाटे यांनी सत्र न्यायालयात अपील केले. आता माणिकराव कोकाटे यांना सत्र न्यायालयाकडून तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र, माणिकराव कोकाटे यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे.

शासनाच्या सदनिका लटल्या प्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूंना दोन वर्षाची शिक्षा झाली होती. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या निर्णयाला कोकाटे यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले. याबाबत सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणीत दोन वर्षांच्या शिक्षेला न्यायालयाने अपील पिरेड पूर्ण होईपर्यंत सस्पेंड केले आणि 1 लाख रुपयांच्या जामिनावर माणिकराव कोकाटे यांची मुक्तता केली.

### अपात्रतेची टांगती तलवार

**अपील पिरेड पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना शिक्षा करण्यास सत्र न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. मात्र आमदार अपात्र प्रकरणी स्थगिती मिळावी, यासाठी सादर केलेल्या अर्जावर उद्या सुनावणी होणार आहे. सरकारी पक्ष उद्या आपली बाजू मांडणार आहे. त्यानंतर कोकाटे यांच्या शिक्षेच्या स्थगितीबाबतच्या अर्जावर सुनावणी केली जाणार आहे. या सुनावणीत नेमकं काय होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, दिवंगत माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांची कन्या अंजली राठोड यांची माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. ही याचिका आज विचारात घेण्यात आली नाही·**



### शेतकऱ्यांनी सात बारा जपावा - आ किसन कथोरेंचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : पंतप्रधान नरेंद्र मोदी जी च्या सरकार मध्ये शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. शेतीचा सात बारा नावावर आहे. म्हणून सरकारी योजनाचा लाभ घेता येतो. वडिलोपार्जित शेती मोठं भाग भांडवल आहे. शेतकऱ्यांनी हे भाग भांडवल जपाऱ्यांसाठी सात बारा जपावा असे आवाहन आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड मध्ये शेतकरी सन्मान निधी हप्ता वितरण सोहळ्याय बोलताना केले. शेतकऱ्यांसाठी खूप योजना आहेत त्याचा लाभ घेण्यासाठी सात बारा नावावर असणे गरजेचे आहे. असे सांगत त्यांनी मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांचे कौतुक करत दुबार पिके काळाची गरज आसल्याचे सांगत. शेती ला उद्या चांगल भविष्य असल्याचे स्पष्ट केले.

# गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे शहरात जनता दरबार संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.२४** : ठाणे जिल्ह्यातील नागरिकांच्या विविध समस्या समजून घेण्यासाठी व जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत "जनता दरबार" ठाणे शहरातील रघुवंशी हॉल, 8, खारकर आळी रोड, जांभळी नाका, ठाणे (पश्चिम) येथे संपन्न झाला.

या जनता दरबारात 560 नागरिकांनी आपल्या समस्या वनमंत्री गणेश नाईक यांच्यासमोर लेखी स्वरूपात निवेदनाद्वारे मांडल्या. बहुतांशी सामाजिक सद्य:स्थिती, शिक्षण, महिला संरक्षण, पाणीपुरवठा, जनजाती, वन, शेतजमीन या व अशा विविध विषयांबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यापैकी काही निवेदनांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून त्यांचे तात्काळ समाधान केले गेले. उर्वरीत तक्रारींबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी विहित नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी, असे निर्देश मंत्री महोदयांनी दिले.

यावेळी आमदार निरंजन डावखरे व संजय केळकर, माजी खासदार संजीव नाईक, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उमेदच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता सुनील पाटील व संदीप चव्हाण, जिल्हा कोषागार अधिकारी महेशकुमार कारंडे, जिल्हा उपनिबंधक डॉ.किशोर मांडे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सोनाली देवरे यांच्यासह अन्य विविध शासकीय विभागांचे अधिकारीही उपस्थित होते.




### कल्याण पंचायत समिती गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेच पहिला हप्ता प्रदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : प्रधानमंत्री आवास योजना टप्पा ०२.ग्रामीण अंतर्गत तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता वन क्लीक द्वारा तसेच घरकुल प्रमाणपत्र कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते देण्यात आले,यावेळी व्यासपीठावर सहाय्यक गटविकास अधिकारी .रघुनाथ गवारी,कृषि अधिकारी. , बाबासाहेब शिंदे, विस्तार अधिकारी पंचायत ,. पराग भोसले. आणि सहाय्यक लेखा अधिकारी,. नारायण गावित उपस्थित होते तसेच घरकुलाचे सर्व अधिकारी आणि ग्रामपंचायत लाभार्थी उपस्थितीत होते.प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा२अंतर्गत ठाणे जिल्ह्याला १८हजार२४८चेउद्दिष्ट देण्यात आले होते. यापैकी तब्बल १७ हजार ९७५घरकुल पात्र लाभार्थ्यांना जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर मंजुरी पत्र आणि पहिल्या हप्ता वन क्लिक वर देण्यात येणार होते. त्यानुसार कल्याण तालुक्यात१हजार९६लाभार्थी असून यातील जवळपास३००लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्र देण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन कल्याण पंचायत समितीच्या सभागृहात करण्यात आले होते.

गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या हस्ते ही घरकुल मंजूर पत्रे वाटप करण्यात आली, यावेळी जीवनदिप महाविद्यालयाचे अध्यक्ष रविंद्र घोंडविंदे तसेच तालुक्यातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गीतासार



यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः । आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ ३-१७ ॥

परंतु जो मनुष्य आत्म्यामध्येच रमणारा आणि आत्म्यामध्येच तृप्त तसेच आत्म्यामध्येच संतुष्ट असतो, त्याच्यासाठी कोणतेही कर्तव्य उरत नाही. ॥ ३-१७ ॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन । न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ ३-१८ ॥

त्या महामनुष्याला या विश्वात कर्मे करण्याचे काही प्रयोजन असत नाही. तसेच कर्मे न करण्याचेही काही प्रयोजन असत नाही. तसेच सर्व प्राणिमात्रातही त्याचा जरादेखील स्वार्थाचा संबंध असत नाही. ॥ ३-१८ ॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर । असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ ३-१९ ॥

म्हणून तू नेहमी आसक्त न होता कर्तव्य कर्म नीट करीत राहा. कारण आसक्ती सोडून कर्म करणारा मनुष्य परमात्म्याला जाऊन मिळतो. ॥ ३-१९ ॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः । लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि ॥ ३-२० ॥


जनकादी ज्ञानी लोकही आसक्तिरहित कर्मांनीच परमसिद्धीला प्राप्त झाले होते. म्हणून तसेच लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊनदेखील तू कर्म करणेच योग्य आहे. ॥ ३-२० ॥

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ३-२१ ॥

श्रेष्ठ मनुष्य जे जे आचरण करतो, त्या त्या प्रमाणेच इतर लोकही आचरण करतात; तो जे काही प्रमाण म्हणून सांगतो, त्याप्रमाणेच सर्व मनुष्यसमुदाय वागू लागतो. ॥ ३-२१ ॥

## रेसिपी

# इडली चाट



सकाळचा नाश्ता पौष्टिक असावा, ज्यामुळे आरोग्यही चांगले राहते आणि संपूर्ण दिवस उत्साही असल्यासारखे वाटते. पण, अनेकदा हा पौष्टिक नाश्ता फारसा चविष्ट नसल्यामुळे अनेक जण तो टाळतात. अशा परिस्थितीत तुम्ही पौष्टिक, पण चवीला चटपटीत असलेला टेस्टी नाश्ता काही क्षणात बनवू शकता. आज आम्ही तुमच्यासाठी दक्षिण भारतीय पदार्थ असलेल्या इडली चाटची चविष्ट आणि आरोग्यदायी रेसिपी घेऊन आलो आहोत. तुम्ही ते सहज आणि खूप लवकर तयार करू शकता.

साहित्य:७-८ इडल्या,१/२ वाटी दही,१ वाटी कांदा,१ वाटी टोमॅटो,३-४ हिरव्या मिरच्या,१/२ वाटी शेव,१/२ चमचा लाल तिखट,१/२ चमचा चाट मसाला,मीठ चवीनुसार,कोथिंबीर, तेल आवश्यकतेनुसार

कृती:इडली चाट बनवण्यासाठी आधी इडलीचे छोटे तुकडे करा आणि एका पॅनमध्ये थोडे तेल घाला आणि ते सोनेरी तपकिरी होईपर्यंत तळा.आता ते एका प्लेटमध्ये काढा. आता त्यात फेटलेले दही, चिरलेला कांदा, टोमॅटो आणि हिरवी मिरची, शेव, कोथिंबीर घाला. त्यावर तुम्ही चाट मसाला, तिखटदेखील घालू शकता.यानंतर तुमच्या चवीनुसार मीठ घाला आणि प्लेटमध्ये सर्व्ह करा.

# कोकणातील साहित्यिक वाटचाल

१८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी दिल्लीत संपन्न झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे उद्घाटन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर कोकणातील साहित्यिक वाटचाल यावर विशेष लेख..



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

महाराष्ट्राच्या इतर विभागाप्रमाणेच एक विभाग म्हणजे कोकण. या कोकणात वेधक निसर्गसौंदर्य, भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण लाभलेला समुद्रकिनारा, विविध झाडे - झुडुपे, डोंगर - दऱ्या अशा अनेक नयनरम्य नैसर्गिक साधनसंपत्ती आढळतात. त्यामुळे इतर विभागाप्रमाणेच कोकणचे वेगळे महत्व आहे. त्यासोबतच कोकण हा महाराष्ट्रातील समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि निसर्गसंपन्नता लाभलेला प्रदेश आहे. त्याचे कारण म्हणजे याच कोकणात अनेक चळवळींचा प्रारंभ झाला आहे. त्यामुळे त्या त्या चळवळींचा मोठा प्रभाव हा कोकणासह महाराष्ट्रात झाला. त्यामुळे कोकणातल्या सर्वच क्षेत्राची वाटचाल अत्यंत लक्षणीय आहे. एवढंच नाही नव्हे तर, इतर चळवळीप्रमाणेच इथल्या साहित्यिक चळवळीचा इतिहास मोठा आहे आणि त्याला विविध साहित्यप्रकारांची आणि प्रसिद्ध साहित्यिकांची पार्श्वभूमी आहे. म्हणूनच कोकणातील साहित्यिक चळवळ ही कालही प्रभावी होती, आजही लक्षणीय आहे आणि भविष्यातदेखील तिचे योगदान मोठे असणार आहे.

कोकणातील साहित्यिक चळवळ ही पारंपरिक आणि आधुनिक विचारांचे मिश्रण

कोकणात नमन, जाखडी, लोककथा, ओव्या आणि भारुडे मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती आणि कालानुरूप आजही त्यांचे अस्तित्व भक्कम आहे. दशावतारी नाट्यप्रकारही इथल्या लोकसंस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या साहित्याच्या माध्यमातून कोकणातील अनेक प्रथा - परंपरा - सण - उत्सव यांचे महत्व अधोरेखित झाले. आजही ग्रामीण भागात वरील प्रकारातुन साहित्य निर्मिती आणि सामाजिक परिवर्तन होण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येते. मुख्यतः लोककथा, ओवी, भारुडे, कविता, कथा, कादंबरी आणि नाटकांमधून व्यक्त झाली आहे. म्हणूनच कोकण हा केवळ निसर्गरम्य प्रदेश नसून, तो मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत महत्त्वाचे योगदान देणारा भाग आहे. कोकणातील साहित्यिक वाटचाल लोकपरंपरेपासून आधुनिक साहित्यापर्यंत विविध टप्प्यांतून गेली आहे. म्हणूनच कोकणातील साहित्यिक चळवळ ही पारंपरिक आणि आधुनिक विचारांचे मिश्रण आहे. लोकसाहित्य, कविता, कथा आणि नाट्य या सर्व माध्यमांतून कोकणाने मराठी साहित्य समृद्ध केले आहे.

कोकणातून अनेक नामवंत साहित्यिक उदयास आले, ज्यांनी मराठी साहित्याला मोठे योगदान दिले. कृ. आ. केळुस्कर यांनी गौतम बुद्ध आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे पहिले चरित्र आपल्या स्वखर्चातून लिहिले आणि त्यातून साहित्य चळवळ प्रवाहित केली. कवी केशवसुत यांना मराठी आधुनिक मराठी कवितेचे मानले जाते. त्यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने लोकांच्या मनातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि अनिष्ट प्रथा यावर कवी केशवसुत यांनी प्रहार करताना मानवतेचा आणि सामाजिक जाणिवा वृंद्धीगत करणारा आशय मांडला. त्यापुढील धनंजय कीर यांच्यासारख्या चरित्र लेखकांनी भारतातील अनेक नामवंत आणि महनीय व्यक्तिमत्वाची चरित्रे निर्माण केली. साहित्य क्षेत्रातील सर्वात मोठा समजला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. स. खांडेकर, भारतरत्न डॉ. पा. वा. काणे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, कथाकार जी. ए. कुलकर्णी, महेश एलकुंचवार यांसारखे कादंबरीकार, लेखक आणि नाटककारही कोकणातील आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने साहित्य चळवळ समृद्ध झाली. जयवंत दळवी आणि इतरांनी नाट्यलेखन आणि विविध क्षेत्रात लेखन करताना त्या - त्या लेखनाचा आशय समाजमनाला भावणारा ठेवला. त्यामुळे संवेदनशील असणारे कोकणी समाजमन या लेखनाकडे आकर्षित झाले. परिणामी कोकणात साहित्यिक चळवळ ही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली.

कोकणात अनेक साहित्य संमेलन यशस्वी

अशा असंख्य लेखकांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित, वंचित आणि सर्वसमावेशक कोकणी मनाला भुरळ घातली. प्रत्येकाच्या लेखणीच्या आशयसंपन्न लेखनामुळे लहान ते ज्येष्ठ यांच्यापर्यंत साहित्याची आवड निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणजे कोकणात अनेक साहित्य संमेलन यशस्वी झाले. रत्नागिरी येथे १९९० मध्ये झालेले साहित्य संमेलनानंतर तत्कालीन संमेलनाध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना केली. आणि तेव्हापासून ते आजपर्यंत कोकणातील वाडी - वस्त्यांमधील संवेदना जपणाऱ्या मनांनी लिहायला सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणजे अनेक कवी, लेखक, कथाकार, कादंबरीकार, ललित लेखन करणारे साहित्यिक तयार झाले. त्यातून त्यांच्याच पुढाकाराने कोकणात विविध साहित्य संमेलने भरवली जात आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने कोकणात झाली. त्यासोबतच कोकण मराठी साहित्य परिषदेचे १७ पेक्षा जास्त केंद्रीय संमेलने, साहित्य विश्वात पहिल्यांदाच सहा राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलन, राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन यासह स्थानिक स्तरावर अनेक संमेलने झाली. त्यात राजापूर येथे ग्रामीण साहित्य संमेलनाचे, नाट्य संमेलनाचे दरवर्षी मोठ्या उत्साहात आयोजन केले जाते. त्यात कोकणी भाषा आणि साहित्य चळवळ यावर मोठ्या प्रमाणात चर्चा घडवून आणली जाते. महिला साहित्य संमेलन असो वा युवा साहित्य संमेलनातून महिला आणि युवा वर्गाच्या समोर असणाऱ्या प्रश्नांना आवाज असतो. त्यामुळे या साहित्य संमेलनात उपस्थितीदेखील मोठी असते.

काळाच्या ओघात कोकणातील असंख्य नवलेखक आपल्या सृजनशील लेखणीच्या द्वारे आता कादंबरी, कविता, लघुकथा, चित्रवाहिन्यावरील मालिकांचे लेखन, संहिता लेखन आणि चित्रपट कथा या माध्यमांतून योगदान देत आहेत. कोकणावर आधारित पर्यटन, विज्ञान, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कथा लोकप्रिय होत आहेत. जुन्या आणि नवीन लेखकांनी कोकणच्या संस्कृतीला केंद्रस्थानी ठेवून लेखन केले आहे.

काही दिवसांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. मागील किती तरी वर्षांपासून सुरू असलेली साहित्यिक आणि मराठी भाषिकांची मागणी विद्यमान सरकारच्या सकारात्मक भूमिकेमुळे पूर्ण झाली. त्यामुळे आता सर्वच मराठी भाषिकांनी मराठी भाषेचे अभिजातपण जपण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या प्रयत्नांना हातभार लावण्यात कोकणचे मोठे योगदान असेल. यावर्षी दिल्ली येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. हे नक्कीच कौतुकास्पद आहे. थोडक्यात अनेक थोर लेखकांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झालेली आहे. त्या भूमीत ज्या अपेक्षेने मराठी भाषा, मराठी साहित्य आणि साहित्य चळवळ उभारली त्याच जोमाने ती पुढे - पुढे जात आहे. अनेक संस्था यासाठी पुढाकार घेऊन भडकत्या प्रसारमाध्यमांच्या काळात तरुण मनाला लिहिते करत आहेत. त्यामुळे कोकणातील साहित्यिक वाटचाल ही आव्हानात्मक जरी असली तरी समाधानकारक आहे.

श्री. माधव विश्वनाथ अंकलगे
वाटद खंडाळा, ता. जि. रत्नागिरी
संपर्क - ९०२१७८५८७४ / ९७६४८८६३३०.

# केडीएमसीच्या 'ह' प्रभागातील मालमत्ता सिल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाच्या डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभाग क्षेत्रातील बिगर निवासी मालमत्तांना वारंवार भेटी व नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ह प्रभागाचे सहा.आयुक्त राजेश सावंत, कर अधिक्षक बाबू पाटील, वरिष्ठ लिपीक नंदकिशोर राणे, संतोष आहेर लिपिक शुभम भारती, कुणाल बसवत, भीम म्हात्रे, शिपाई दीपक म्हात्रे यांच्या पथकाने थकबाकी पोटी बिगर निवासी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई नुकतीच केली आहे.

या धडक कारवाईत वसंत हेरिटेज बिल्डिंग, महात्मा फुले रोड, गरिबाचा वाडा डोंबिवली पश्चिम येथील 5 दुकाने 2 लाख 38 हजार 672रू.मालमत्ता कर थकबाकी पोटी सील करण्यात आली. प्रशासनाच्या मालमत्ता कर थकबाकी पोटी सील करण्याच्या धडक कारवाई बडग्यामुळे मालमत्ता कर थकबाकीदाराचे धाबे दणाणले असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते.

# माथाडी संघटनांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक

## – कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : माथाडी कायद्यामुळे अनेक माथाडी कामगारांना न्याय मिळाला असून या कायद्यामुळे माथाडी कामगारांचे जीवन सुकर झाले आहे. माथाडी कायदा एक चळवळ आहे. माथाडी कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संघटनांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी व्यक्त सांगितले.

सह्याद्री अथितीगृह येथील दालनात माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत माथडी कायदा बचाव कृती समिती पदाधिकारी यांच्यासमवेत बैठक झाली. यावेळी कामगार विभागाचे प्रधान सचिव आय.ए.कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच.पी. तुम्मोड, उपसचिव स्वप्नील कापडणीस, अवर सचिव दिलीप वणीरे, सहआयुक्त शिरीन लोखंडे, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सरचिटणीस नरेंद्र पाटील, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे बाबासाहेब आढाव व युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते.

कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर म्हणाले, माथाडी कायदा रद्द होईल अशा अफवा असून त्यावर विश्वास ठेवू नये. माथाडी कामगार कायदा हा एकमेव महाराष्ट्रात लागू आहे. त्यामुळे हा कायदा रद्द होणार नसून सर्व संबंधितांशी चर्चा करून यासंदर्भात सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे श्री. फुंडकर यांनी नमूद केले.

### पदभरतीत अंशतः न्याय

माथाडी सल्लागार समितीची पुनर्रचना करणे व पुनर्रचित सल्लागार समितीवर अनुभवी कामगार नेत्यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. विविध माथाडी मंडळातील कार्यालयीन सेवेत माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देण्याबाबत अंशतः तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार माथाडी कामगारांच्या मुलांना पदभरतीत अंशतः न्याय दिला जाईल, असेही कामगार मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

### माथाडी मंडळांशी विभागवार संवाद साधणार

माथाडी कामगारांचे प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी माथाडी मंडळाशी विभागवार संवाद साधणार असून प्रत्येक मंडळासाठी बैठकीचे आयोजन करून चर्चा करण्यात येईल. तसेच सुरक्षा रक्षक मंडळाच्या समस्यांबाबत देखील विचार करून मार्ग काढण्यात येईल असेही यावेळी श्री. फुंडकर यांनी सांगितले.यावेळी अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार युनियन,ट्रान्सपोर्ट अँण्ड डॉक वर्कस युनियन, सुरक्षा रक्षक कामगार युनियन, अखिल महाराष्ट्र माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जगतगुरु नरेंद्राचार्य महाराजांच्या भक्तांकडून

# विजय वडेट्टीवारांचा जाहीर निषेध



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण :जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांना एकेरी शब्दात उल्लेख केल्याबद्दल पेण येथील समस्त भक्तगणांनी कॉग्रेस आमदार विजय वडेट्टीवार याचा जाहीर निषेध केला आहे. मुर्दाबाद मुर्दाबाद विजय वडेट्टीवार मुर्दाबाद अशा घोषणा देऊन फोटोला जोडे मारून निषेध केला.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज यांचे पेण शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भक्तगण असल्याने आमच्या दैवताविषयी केलेले चुकीचे वक्तव्य आम्ही कदापी सहन करणार नाही त्यामुळे आम्ही पेणकर या घटनेचा जाहीर निषेध करत आहोत. पेण शहरातून भक्तगणांनी निषेध रॅली काढून आपल्या भावना व्यक्त केल्या.

# मुरबाड- कल्याण मार्गावर

## नवीन सी.एन.जी. टॅक्सींना परवानगी दया - संघटनेची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: गेल्या 20 ते 25 वर्षा पासून मुरबाड -कल्याण मार्गावर चालणार्या टॅक्सी गाड्यांची मुदत संपली असून त्या कालबाह्य झालेल्या आहेत.मुरबाड- कल्याण प्रवाशांच्या सेवेसाठी काम करत आहेत. आजही याच गाड्यांमधून रोजचे शेकडो प्रवासी जीव मुठित घेऊन नाईलाजाने प्रवास करत आहेत. या मुदत संपलेल्या टॅक्सीवर कल्याण आर.टी.ओ कारवाई करत असून गरिब चालक मालकांवर 25 ते 30 हजारांचा दंड आकारून नाहक आर्थिक भुर्दंड आकारून गाड्याही जप्त करत आहे.या गाड्यांचा अपघात झाल्यास प्रवासी व गाडी मालक यांना कोणताही इन्सुरस मिळत नाही. गेले 20 ते 25 वर्ष हे टॅक्सी चालक मालक व्यवसाय करत असून आज त्यांच्यावर उपासमारीची व बेरोजगार होण्याची वेळ आली आहे. टॅक्सी हे सर्वाचे उदरनिर्वाहाचे साधन असून त्यांचे कुंटुब त्यावर चालत आहे. असे असताना शासन जाणून बुजून दुर्लक्ष करत असून आमचे जूने परमिट उतरवून जून्या परमिट धारकांना नविन इर्टिगा , बोलेरो, किंवा गामा सि.एन.जी. गाड्यांना परवानगी द्यावी अशी ठाम मागणी भूमिपुत्र टॅक्सी संघटना मुरबाड-कल्याण यांनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदिन देऊन केली आहे.

# 'ए आय' तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व महाराष्ट्र करेल!

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच देशाच्या 'एआय' आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशिप समिट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नॅसकॉमचे श्रीकांत वेलामकन्नी यांनी मुलाखत घेतली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात 'एआय' सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारीतून इंडस्ट्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने १ ट्रिलियन डॉलरपर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राज्याने नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला (MMRDA) १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### डेटा सेंटर आणि फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

देशातील ६०% डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०% वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

### नाशिक कुंभमेळा ; अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले.

### कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'ॲग्री-स्टॅट' उपक्रमांतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस आहे.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही 'इनोव्हेशन सिटी' देशातील सर्वात प्रगत शहरांपैकी एक ठरेल. तीनशे एकरमध्ये ही सिटी विकसित केली जाणार असून या सिटीमध्ये तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर भर दिला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथे जीसीसी पार्क विकसित करणार असल्याचेही ते म्हणाले. यासाठी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपल्या कल्पना आणि योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# उल्हासनगर पालिकेची अनधिकृत बांधकामांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरात अनधिकृत बांधकामांवर अंकुश लावण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका आक्रमक झाली आहे. उल्हासनगर २ येथील हनुमाननगर, दुर्गानगर आणि डंपिंग ग्राऊंड या भागात सरकारी भूखंडांवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे केली जात असल्याची माहिती मिळताच पालिकेने आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या आदेशानुसार तत्काळ कठोर कारवाई केली. या कारवाई दरम्यान स्थानिक नागरिकांनी राडा घातल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता.



उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या आदेशानंतर अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांनी संबंधित सहाय्यक आयुक्तांना तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार, २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिस बंदोबस्तात ही कारवाई पार पडली. या मोहिमेत १० खोल्यांच्या जोत्यांचे बांधकाम, ५ पक्क्या खोल्यांचे आणि २ झोपड्यांचे बांधकाम संपूर्णपणे निष्कासित करण्यात आले. या कारवाई दरम्यान आक्रमक झालेल्या स्थानिक महिलांनी राडा घातला, एका महिलेने संतप्त होत स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. २ आणि नोडल अधिकारी गणेश शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या पथकाने ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली.

शहरात अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामे वेगाने वाढत असल्याने महानगरपालिकेने आता कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित विभागाने स्पष्ट इशारा दिला आहे की, सरकारी भूखंडांवर किंवा परवानगीशिवाय उभारण्यात येणाऱ्या कोणत्याही बांधकामांवर कठोर कारवाई केली जाईल आणि दोषींवर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेच्या या धडाकेबाज कारवाईमुळे शहरातील अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. यापुढे अशा मोहिमा अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत पालिका प्रशासनाने दिले आहेत.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# अर्थसंकल्पातील घोषणा आरोग्य सेवा कामगार चिंतेत

**महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अनेक वास्तू बांधून होतात पण मनुष्यबळाऐवजी त्या सेवा देता येत नाहीत. त्याकरिता खासगिकरण धोरण आणल्याची चर्चा आहे**

**पहिल्या टप्प्यात आरोग्य सेवामध्ये पीपीपी धोरण**

१) दहिसरमधील ४९० रुग्णशय्यांचे भगवती रुग्णालय
२) बोरिवलीतील पंजाबी गल्ली चिकित्सा केंद्र (डायग्रॉस्टिक सेंटर)
३) माहीमचे जाखादेवी आरोग्य सुविधा केंद्र
४) विक्रोळी पार्कसाईट रुग्णालय
५) देवनार मधील ३०० रुग्णाशय्येचे एमएमआरडीएकडून हस्तांतरित होणारे रुग्णालय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : परवडणाऱ्या आरोग्य सुविधा देण्यासाठी येत्या काळात सार्वजनिक खाजगी भागीदारीचे (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) धोरण अवलंबण्याचे मुंबई महापालिकेने ठरवले आहे. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी याबाबतची घोषणा आगामी अर्थसंकल्पात केली आहे. मात्र या धोरणाला शिवसेना (ठाकरे) प्रणित कामगार सेनेने विरोध दर्शवला आहे.

मुंबई महानगरपालिकेने आरोग्य विभागासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी धोरण आणण्याचे ठरवले आहे. मुंबई महापालिकेची विविध रुग्णालये, प्रसूतीगृहे दवाखाने ३० वर्षांपर्यंत प्रचलन व परीरक्षण करण्याकरिता म्हणजेच या आरोग्य सेवा चालवण्याकरिता इतर संस्थांकडे ३० वर्षाकरिता दिले जाणार आहेत. त्याकरिता लवकरच इच्छुक संस्थाकडून अर्ज मागवले जाणार आहेत.

विकास नियोजन आराखडा २०३४ अंतर्गत आरोग्य सेवेसाठी आरक्षित जमिनी, रुग्णालये, प्रसूतीगृहे, दवाखाने यांचा या धोरणात समावेश केला जाणार आहे. त्यामुळे रुग्णांना करावा लागणारा खर्च आणि मुंबई महानगरपालिकेचा खर्च कमी होईल असा विश्वास पालिका प्रशासनाला आहे.

## सार्वजनिक खाजगी भागीदारीचे धोरणास कामगार सेनेचा विरोध

पालिकेच्या या धोरणाला भारतीय कामगार सेनेने विरोध केला आहे. हे धोरण म्हणजे खाजगीकरणाचा डाव असून यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांना हटवून कंत्राटी कामगारांची भरती करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य सेवा देताना मनमानी केली जाणार असल्याचा आरोप कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांनी केला आहे. दरम्यान, महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अनेक वास्तू बांधून होतात पण मनुष्यबळाऐवजी त्या सेवा देता येत नाहीत. त्याकरिता हे धोरण आणल्याची प्रतिक्रिया पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## आरोग्य विभागाचा खर्च जास्त उत्पन्न कमी

एका छोट्या महानगरपालिकेच्या संपूर्ण अर्थसंकल्पाचे आकारमान जेवढे असते तेवढी तरतूद म्हणजेच साधारण तीन हजार कोटी दरवर्षी मुंबई महापालिका फक्त आरोग्य विभागासाठी करत असते. त्यापैकी काही ठराविक भांडवली तरतूद आरोग्य विभागाशी संबंधित विकासकामांकरीता राखीव ठेवलेली असते. सन २०२५-२६ या कालावधीसाठी पालिकेची आरोग्य विभागासाठी एकूण तरतूद ७३८० कोटी आहे. त्यापैकी भांडवली खर्चासाठी २१७२ कोटी राखीव आहेत. तर ५२०७ कोटी महसूली खर्च म्हणजेच आस्थापना विभागावर खर्च होणार आहेत.

# नवीमुंबईतील नागरिक हवा प्रदूषणाने त्रस्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळातील काही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तळोजातील नागरिक प्रदूषणामुळे हैराण झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वारंवार तक्रारी करुनही प्रदूषणाची समस्या सुटू शकलेली नाही. या पार्श्वभूमीवर इंडियन नॅशनल परिवर्तन पार्टीने राज्य आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना येथून हटविण्याची मागणी केली आहे.

तळोजा औद्योगिक परिसरातील वायू व जल प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) या दोन्ही मंडळांकडे नागरिकांनी वारंवार लेखी व तोंडी तक्रार करुनही मंडळांच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई केली जात नसल्याने नागरिक त्रस्त असल्याचा आरोप इंडियन नॅशनल परिवर्तन पार्टीचे राजीव सिन्हा यांनी केला आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील उल्का कंपनी (शितगृह) आणि त्यासमोर असलेल्या इतर मासळी साठवणुकीची शितगृह तसेच तळोजा सीईटीपी प्रकल्प आणि रामकी मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याने हा तळोजातील नागरिकांना श्वसनाचे विकार होत असल्याचा नागरिकांचा दावा आहे. सामाजिक कार्यकर्ते सिन्हा यांनी केलेल्या दाव्यानुसार प्रदूषणाच्या सुरुवातीला एमपीसीबीकडे तक्रारी केल्यानंतर एमपीसीबीचे सहाय्यक प्रादेशिक अधिकारी विक्रांत भालेराव यांनी काही प्रमाणात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, मात्र कालांतराने कंपन्यांच्या प्रभावाखाली जाऊन त्यांनी पूर्वीसारखेच प्रदूषण सुरू राहू दिले, असा सिन्हा यांनी आरोप केला आहे.

रहिवासी तक्रार करत असताना अधिकारी मात्र 'हा धूर किंवा दुर्गंधी नसून धुके व बांधकामातील धूळ आहे' असे चुकीचे कारण सांगून जबाबदारी टाळत असल्याचेही चित्र आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तळोजा फेज २ मध्ये तीन महिने राहून प्रत्यक्ष प्रदूषणाचा अनुभव घ्यावा, अशी मागणी नागरिकांच्या वतीने केली जात आहे. तसेच सीपीसीबीच्या पुणे विभागाचे प्रादेशिक संचालक आणि एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करत त्यांना सेवेतून हटवण्याची मागणी नागरिकांकडून होऊ लागली आहे. या संदर्भात नागरिकांनी लोकायुक्तांकडे तसेच पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादाकडे येथे तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र एमपीसीबीने या तक्रारी बंद करण्याचा प्रयत्न केला आणि प्रदूषण हटवण्याऐवजी केस मिटवण्यावर भर दिल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते सिन्हा यांनी केला आहे.


> 66
>
> **रात्रीच्यावेळी तळोजा येथील ६ फीश मील (कोरडी पावडर बनविणाऱ्या) बंद ठेवण्याची कारवाई नोव्हेंबर ते मार्च अखेरपर्यंत रात्रीच्या वेळेस पूर्ण बंद करण्याची कारवाई मंडळाने केली आहे. तळोजातील ४ ब्रोमीन उत्पादन करणारे युनिट बंद आहेत. सॉल्व्हंट रिकव्हरी उत्पादन घेणाऱ्या कारखान्यांना कोणतेही उल्लंघन करुन नयेत, असे कडक निर्देश दिले आहेत. तळोजा सीईटीपी व्यवस्थित चालवावे यासाठी एमआयडीसीला वेळोवेळी निर्देश दिले आहेत. सध्या सीईटीपीतून प्रक्रियायुक्त शुद्धपाणी बाहेर जात आहे. नागरिकांमध्ये जनजागृती व सुसंवाद होण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत.**
>
> **विक्रांत भालेराव, सहाय्यक प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी**

# पनवेल महापालिका महिलांना देणार मोफत ड्रायव्हिंगचे धडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : पनवेल महापालिकेने यंदाच्या आर्थिक वर्षात महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'गुलाबी अर्थसंकल्प' या संकल्पनेंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले. याच उपक्रमापैकी महापालिका क्षेत्रात राहणाऱ्या मुली व महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण तसेच प्रशिक्षणानंतर संबंधित महिलांना वाहन चालकाचा शिकाऊ परवाना काढून देण्यासाठी प्रशिक्षण संस्था नेमण्याच्या हालचाली पालिकेत सुरू झाल्या आहेत. तब्बल एका लाखांहून अधिक महिलांना महापालिकेच्या या योजनेचा लाभ मिळू शकेल.

पनवेल महापालिकेमध्ये सर्वाधिक महिला वाहन चालक निर्माण करण्याचा पालिकेचा हा प्रयत्न आहे. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत राहणार आहे. सर्वाधिक स्वमालकीची वाहने असलेले शहर म्हणून पनवेलची ओळख आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात पनवेल शहर, खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा, नवीन पनवेल, खांदेश्वर ही उपनगरे आहेत. ९ लाख लोकवस्तीच्या महापालिका क्षेत्रात महिला आणि तरुण मुलींची (१८ वर्षांवरील) संख्या तीन लाखांवर आहे. आपत्तीवेळी प्रत्येक महिलेला किमान वाहन



चालविता आले पाहिजे या उद्देशाने पनवेल महापालिकेचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांनी महिला सक्षमीकरणाच्या योजनेसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षकाखाली या योजनेसाठी २५ लाखांची तरतूद केली.

यंदा आर्थिक वर्षात विद्यमान पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी शहरातील महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी बुधवारी याबाबतची निविदा जाहीर करुन महिलांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांकडून त्यांचे दरपत्रक मागविले आहे. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी पात्र असाव्यात तसेच प्रादेशिक परिवहन विभागाकडे त्या नोंदीत असाव्यात अशा अटींच्या अधीन या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार आहे. या योजनेतून पालिका क्षेत्रातील सर्वच घटकांमधील महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण मोफत मिळू शकेल.

> **ही योजना राबविण्यासाठी सध्या वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निवडीची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया अंतिम झाल्यावर महापालिकेतील सर्वच प्रभाग स्तरावर याबद्दल महिलांकडून अर्ज मागवले जातील. त्यानंतर प्रत्यक्षात वाहन चालविण्याचे प्रशिक्षण आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर शिकाऊ वाहन चालविण्याचा परवाना संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून काढून दिले जातील. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा.**
>
> **● कैलास गावडे, अतिरिक्त आयुक्त, पनवेल महापालिका**

# नौपाड्यातील इमारतीला आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : येथील नौपाडा भागात एका सहा मजली इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका घरात देव्हाऱ्याला आग लागल्याची घटना सोमवारी उघडकीस आली आहे. ही आग मोठ्याप्रमाणत असल्यामुळे खिडकीद्वारे तिसऱ्या मजल्यावील खिडकीत ठेवलेल्या कागदाच्या गठ्ठयाला लागली. या आगीच्या धुराचे लोट मोठ्याप्रमाणात परिसरात पसरल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतिही जिवीत हानी झालेली नाही.

नौपाडा भागात असलेल्या विष्णूनगर परिसरात एक सहा मजली इमारत आहे. या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील एका रूममध्ये सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास देव्हाऱ्याला आग लागली होती. हा देव्हारा खिडकीजवळ होता. त्यामुळे खिडकीद्वारे आग तिसऱ्या मजल्यावरील खिडकीमध्ये ठेवलेल्या कागदाच्या गठ्यांना लागली. त्यामुळे आग आणखी मोठ्याप्रमाणात पसरली. या आगीच्या धुराचे लोट मोठ्याप्रमाणात परिसरात पसरले. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच, ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यासीन तडवी आणि कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. या आगीत दुसऱ्या मजल्यावरील घरातील देव्हारा, कपाट, काही साहित्य तसेच काही इलेक्ट्रिक वाहिन्या पूर्णपणे जळाल्या आहेत. या घरात वृद्ध दांपत्य राहतात त्यांना धुराचा त्रास होऊ लागल्यामुळे बाजूच्या घरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून स्थलांतर केले होते.

सुदैवाने या घटनेत कोणतिही जिवीत हानी झाली नाही. ही आग अर्धा पाऊण तासाच्या अथक परिश्रमानंतर पूर्णपणे विझविण्यात आली, अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

# महिलांना लुबाडणारे दोन ठग अटकेत

## मिरा भाईंदर मध्यवर्ती गुन्हे शाखेची कारवाई

**मिरा भाईंदरच्या नवघर तसेच मुंबई, कल्याण, ठाणे परिसरातील विविध पोलीस ठाण्यात फसवणुकीचे १० गुन्हे दाखल आहेत**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई**- वयोवृध्द महिलांना रस्त्यात गाठून त्यांना लुबाडणाऱ्या दोघांना मध्यवर्ती गुन्हे शाखेने गुजराथ येथून अटक केली आहे. त्यांनी भाईंदर, मुंबई ठाणे परिसरात १० फवसणुकीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. ४ फेब्रुवारी रोजी भाईंदर येथे राहणाऱ्या सरवणी कुमावत (६०) या महिलेला दोन अज्ञात इसमांनी रस्त्यात गाठले होते. त्यांना बोलण्या गुंतवून त्यांच्याकडील सुमारे ८० हजार रुपये सोन्याने दागिने काढून फसवणूक केली होती.




गेल्या काही दिवसात अशाप्रकारचे अनेक गुन्हे घडले होते. या प्रकरणाचा तपास मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या मध्यमवर्ती गुन्हे शाखेकडून करण्यात येत होता. याप्रकरणी सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी दोन आरोपींची चेहरे निष्पन्न केले होते. मात्र ते कोण आहेत याची ओळख पटत नव्हती.

दरम्यान या आरोपींचे फोटो पोलिसांच्या एका व्हॉटसअपग्रुपवर टाकले होते. गुजराथच्या बडोदा येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या भगवान पाटील या पोलीस अमलदाराने आरोपींचे फोटो ओळखले आणि त्यांची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी मानाभाई मारवाडी (४५) आणि गोपीभाई मारवाडी (२३) या दोघांना अहमदाबाद येथील सरदार नगर पोलीस ठाण्याच्या मदतीने अटक केली.

आरोपी हे सराईत गुन्हेगार आहे. त्यांच्यावर मिरा भाईंदरच्या नवघर तसेच मुंबई, कल्याण, ठाणे परिसरातील विविध पोलीस ठाण्यात फसवणुकीचे १० गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती मध्यमर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांनी दिली. पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मध्यमर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन बेंद्रे, प्रशांत गांगुर्डे, दत्तात्रय सरक आदींच्या पथकाने ही कामगिरी केली

# महाशिवरात्रीनिमित्त अंबरनाथममध्ये वाहतूक बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथच्या शिलाहारकालीन शिवमंदिरात दरवर्षी महाशिवरात्री निमित्त मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यामुळे अंबरनाथ पूर्वेतील रेल्वे स्थानकापासून, स्वामी समर्थ चौक, गोविंद तीर्थ पूल आणि आसपासच्या भागात मोठी गर्दी होत असते. त्यामुळे वाहतूक विभागाने येथील वाहतुकीचे मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवार २५ फेब्रुवारी सायंकाळपासून ते गुरूवार २७ फेब्रुवारीपर्यंत वाहतुकीत बदल असतील. त्यामुळे मंदिराच्या दिशेला प्रवास करताना पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे.

अंबरनाथचे शिलाहारकालीन शिव मंदिर हे जिल्ह्यातील भाविकांचे मोठे केंद्र आहे. दरवर्षी येथे महाशिवरात्रीनिमित्त मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा केला जातो. गेल्या वर्षापासून या भागात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून शिवमंदिर परिसर सुशोभीकरण प्रकल्प सुरू आहे. त्यात घाट उभारणीपासून विविध कामे केली जात आहेत. येथील चेहरामोहरा बदलत असून त्यामुळे भाविकांचा ओघही मंदिराकडे वाढला आहे. येत्या २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त येथे मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक विभागाने शिवमंदिर परिसर आणि अंबरनाथ पूर्वेतील भागामध्ये वाहतुकीमध्ये बदल केले आहेत. वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी याबाबद अधिसूचना जाहीर केली आहे. त्यानुसार वाहनचालकांनी याची नोंद घेऊनच प्रवास करावा असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

**-: निविदा सूचना :-**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं. ८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक २५/०२/२०२५ ते ०४/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि. ११/०३/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अनु. | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | सूरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | को-या निविदा फॉर्मची किंमत रु. | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | ७१ सन २०२४-२५ | M & R to Ambernath Water Works-Cleaning of various GSR/MBR/ESR/Sump in Ambernath area | ६,९७,९६६/- | ६,९८०.००/- | एकूण रक्कम रु. २७९२०/- (अ) प्रारंभिक रक्कम रु. १३९६०/- (ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु. १३,९६०/- | ६ महिने | ५९०.००/- | The firm/contractor should registered with MJP in class VII and above. (Civil) MIDC/CIDCO/PWD Or Any Govt. Department in India in (Civil) Equivalent class of MJP | दि. ११/०३/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) | दि. १२/३/२०२५ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

टिप-
१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य. विभाग,
अंबरनाथ.

* जावक क्रमांक : जिमाका/ठाणे/जाहि/2024-25/89

# अवैध खनिज वाहतूक थांबवा

## - मंत्री शंभूराज देसाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई : राज्यातील खाणपट्टयांमधून होणारी अवैध खनिज वाहतूक रोखण्यासाठी खनीकर्म विभागाने यंत्रणा अद्ययावत करून त्यावर तात्काळ निर्बंध आणण्याचे निर्देश पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्रालयातील दालनात कोकण महसूल विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, महासंचालक डॉ. जी. डी. कांबळे, उपसंचालक रोशन मेश्राम व कोकण विभागातील सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी उपस्थित होते.खनिजाची वाहतूक करताना खनिजे झाकलेली नसल्याने धूळ उडून प्रदूषण होते. शिवाय अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा वाहनांवर कारवाई करून खाणीचे परवाने तत्काळ निलंबित करण्याचे निर्देश श्री.देसाई यांनी यावेळी दिले. खाणींमधून खनिज तसेच गौण खनिजाची चोरी रोखण्यासाठी जेणेकरुन ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याचे नियंत्रण जिल्हा खनीकर्म अधिकाऱ्यांच्या मोबाईलवर ठेवावे. या होणाऱ्या चोऱ्या रोखता येतील. तसेच राज्यभरातील खनिकर्म विभागाची यंत्रणा सर्वकंष दृष्टिकोनातून अद्यावत करण्याच्या सूचना श्री. देसाई यांनी यावेळी दिल्या.

कोकण महसूल विभागात लिलावासाठी ज्या संस्थांनी खाणी उत्खननासाठी घेतल्या आहेत. त्यांना एक महिन्याची नोटीस देऊन तात्काळ काम सुरू करण्याचे आदेश द्यावेत. अन्यथा संबंधित संस्थेचा उत्खननाचा परवाना निलंबित करण्याचे निर्देश खनीकर्म मंत्री श्री. देसाई यांनी दिले.

# सर्व जिल्ह्यांत बालभवनसारखे केंद्र उभारणार

## - राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होण्यासाठी जवाहर बालभवन अतिशय मोलाची भूमिका बजावत आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात बालभवनसारखे केंद्र उभारण्याचा प्रयत्न केला जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

मुंबईतील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनचा 73 वा वर्धापन दिन सोहळा राज्यमंत्री डॉ.भोयर यांच्या उपस्थितीत सोमवारी साजरा झाला. यावेळी त्यांच्यासमवेत बालभवनचे अशासकीय सदस्य प्रशांत भामरे, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे, जवाहर बालभवनच्या संचालक नीता पाटील, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्मित असणे हा शालेय शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. यासाठी शिक्षण आनंददायी असण्यावर राज्य शासनाचा भर आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. 73 वर्षांपूर्वी स्थापन झालेले जवाहर बालभवन हेच कार्य अतिशय उत्तमरितीने पार पाडीत असून विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, खेळ, विविध छंद यामध्ये मिळविलेले नैपुण्य पाहता आणि यांद्वारे त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे स्मित पाहता ही इमारत उभारण्यामागील उद्देश सफल झाल्याचे दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच आपली आवड जोपासता यावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात बालभवनसारखे केंद्र उभारण्याचा आपला प्रयत्न राहील, असे ते म्हणाले.

राज्यमंत्री डॉ.भोयर यांच्या हस्ते बालभवनच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यावेळी भरतनाट्यम, बालगीत, आदिवासी कोरकू नृत्य आदी कलाविष्कार सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

बालभवनच्या संचालक नीता पाटील यांनी प्रास्ताविकाद्वारे बालभवनच्या स्थापनेचा उद्देश सांगून आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे हे ब्रीद घेऊन मागील 73 वर्षे जवाहर बालभवन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याची माहिती दिली. वर्षभर राबविण्यात येत असलेले विविध छंद शिबीर, गायन, नृत्य प्रशिक्षण, कार्यशाळा आदी विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील अंगभूत कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे हे मुक्तांगण असल्याचे त्यांनी सांगितले.

### संक्षिप्त

# मनसेचे अंबरनाथ नगरपरिषदेत कचरा फेको आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेले तीन महिने वेतन न मिळाल्याने अंबरनाथ नगर परिषदेतील कंत्राटी सफाई कामगारांनी अचानक काम बंद केलंय . यामुळे शहरभरात कचऱ्याचे ढिगारे साचू लागले आहेत. नागरिकांना दुर्गंधी आजारांचा त्रास सोसावा लागत आहे. शहरातील कचरा उचलण्याची तात्काळ नगर परिषदेने व्यवस्था न केल्यास मनसेच्या वतीने कचरा नगरपरिषदे च्या आवारात आणून टाकणारे कचरा फेको आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर संघटक एड. स्वप्निल बागुल यांनी दिला आहे.

बागुल त्यांनी नगरपरिषदेस दिलेल्या एका निवेदनात म्हटले आहे की, अंबरनाथ नगरपरिषद मोठ्या थाटामाटात अंबरनाथ विकासाचा पॅटर्न टूम वाजवते आणि मोठ मोठ्या जाहिरातबाजी करते. पण, प्रशासकीय राजवटीत सर्व सामान्य नागरिकांच्या मूलभूत सेवा सुविधा मात्र पूर्णतः दुर्लक्षित आहेत. आपल्या दैनंदिन कचरा संकलन करणारे कर्मचारी, घंटागाडी कर्मचारी हे अतिशय महत्वाचे काम करतात, आपण कचरा दिसला ही नाकावर रुमाल लावून पुढे जातो.

कित्येक करोड रुपये खर्च करून, असा बेगडी विकासाचा पॅटर्न शहरात काय कामाचा जर शहरात स्वच्छता आणि मूलभूत सुविधाच नाहीत. त्यामुळे नको तो विकासाचा अंबरनाथ पॅटर्न जिथे कचरा आणि इतर मूलभूत सुविधा मिळत नाही. येत्या ३ दिवसांत आपण शहरातील कचरा समस्या मार्गी न लावल्यास अंबरनाथ नगरपरिषदेत शहरातील कचरा जमा करून निषेध आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वप्निल बागुल यांनी दिला आहे.

# अनधिकृत बांधकाम करणाऱ्या टोळ्यांचा म्होरक्या ठाण्यात

## मनसे नेते राजू पाटील यांची सडकून टिका



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अनधिकृत बांधकाम करणाऱ्या गँग्स ऑफ डोंबिवलीचा म्होरक्या ठाण्यात राहत असल्याची टिका मनसेचे माजी आमदार तथा नेते राजू पाटील यांनी शिंदे पिता पुत्रांवर नाव न घेता केली. कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील 65 इमारती आणि दिवा येथील इमारती याबाबत रहिवाशांना न्यायालयीन लढा लढण्यासाठी मनसे सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे सांगत राजू पाटील यांनी पत्रकार परिषद घेत मनसेची भूमिका मांडली. यावेळी त्यांनी बोलतांना सांगितले कि, अनधिकृत बांधकाम प्रकरणी गुन्हे दाखल असलेले जास्त शिंदे गटात असून सेलेब्रिटी सलमान खान यांना भेटण्यासाठी एकनाथ शिंदे यांच्याकडे वेळ आहे मात्र 65 इमारतींमधील नागरिकांना भेटायला वेळ नाही. गंगेत डुबकी मारून पाप धुण्यापेक्षा इथे येऊन रहिवाशांना भेटा पुण्य कमवा. अनधिकृत बांधकाम करनाऱ्यांना, कागदपत्र बनवनऱ्यांना, लोकांची फसवणूक करणाऱ्यांना ठाण्यातून अभय मिळत आहे.इथले पालकमंत्री आहात, नगरविकासमंत्री आहात, तुमचा मुलगा इथला खासदार आहे. विधानसभा निवडणुकीत संबंधित बिल्डरला इमारत तोडण्याची धमकी देत काम करायला लावले. अनधिकृत बांधकाम करणारी साखळी जोपर्यंत तोडत नाही तोपर्यंत इथे काही होणार नाही. काही लोक हस्तक दिसायला फक्त आमदार असल्याची टिका आमदार राजेश मोरे यांच्यावर केली.

तर रहिवाशांच्या पाठीशी मनसे उभी असून त्यांना कायदेशीर सल्ला देण्यासाठी लागणारी आर्थिक मदत करू मात्र यांना दिलासा कसा देणार असा सवाल राजू पाटील यांनी केला. या प्रकरणी मंत्री गणेश नाईक यांना भेटणारअसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून न्यायाची अपेक्षा असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# बंजारा समाजासाठी समाजहॉल उभारणार

## कुणाल पाटील यांचे आश्वासन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेवालाल महाराज यांच्या 286 जयंती सोहळ्याच्या निमित्ताने जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन कल्याण शीळ रोडवरील पिसवली टाटा पॉवर हाऊस येथे केले होते. या सोहळ्यात कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे स्थायी समिती सदस्य तथा माजी नगरसेवक कुणाल पाटील यांनी सहभागी होत संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले. यावेळी उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधत बंजारा समाजासाठी समाजहॉल उभरण्याचे आश्वासन दिले. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजबांधव उपस्थित होते.

# किलीमांजारो शिखर सर

## निखिल कोकाटे यांची ऐतिहासिक कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पुणे जिल्ह्यातील पहिले आदिवासी गिर्यारोहक निखिल कोकाटे यांनी आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर किलीमांजारो यशस्वीपणे सर केले आहे. त्यांच्या या मोहिमेसाठी आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या तत्परतेने अवघ्या एका दिवसात विभागामार्फत ५ लाख ४० हजार ८०० रु.ची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली.

निखिल कोकाटे यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी अभिनंदन केले आहे. आदिवासी युवकांना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने आदिवासी विकास विभागाने केलेल्या या सहकार्यामुळे ही ऐतिहासिक कामगिरी करु शकलो अशी प्रतिक्रिया निखिल कोकाटे यांनी दिली. या सहकार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आभार मानले आहेत.

# १ मार्चपासून रायगड जिल्ह्यात लसीकरण मोहिम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यात एक ते पंधरा वर्षे वयोगटातील 6, लाख21 हजार,698 मुला-मुलींना शनिवार दिनांक 1 मार्च 2025 पासून पुढे सोळा दिवस लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. जे.ई हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. तो मेंदूवर परिणाम करतो हा आजार संक्रमित डासाच्या विशेषत: प्रजातीच्या डासाच्या चावण्याद्वारे पसरतो. हा अतिशय प्राणघातक आहे. प्रामुख्याने पंधरा वर्षपेक्षा कमी वयाच्या मुलांना प्रभावित करतो. या आजाराची लागण झालेल्यांपैकी 70 टक्के लोकांच्या जीवितास हानी होते किंवा कायमचे अपंगत्व येते. जे.ई व्हायरस हा एलोफेअर व्हायरस आणि डेंगू वायरस (FLAVIVRIDAE) जातीचा आहे. जे.ई विषाणू विशेषत: क्युलेक्स विषाणू गटातील (CX. TRITAENEORTHYNCHUS) क्युलेक्स डासाच्या चावण्याद्वारे प्रसारित होतो. जलपक्षी व डुक्कर या जंतूंची वाढ करतात. तथापि मानवाकडून मानवाला प्रसार होत नाही. भारतात याचा प्रसार मुख्यतः पावसाळयात आणि पावसाळ्यानंतरच्या हंगामात होतो. आजाराची लक्षणे ताप डोकेदुखी, उलट्या, फिट येणे आणि, कोमा हे आहे. जे.ई प्रतिबंध आणि नियंत्रण उपाय म्हणून वयक्तीक संरक्षण, अळी नियंत्रण, डुक्कर नियंत्रण., या आजारावर प्रतिबंधकउपचार म्हणून लसीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. ही लसीकरण मोहीम आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व एकात्मिक बालविकास विभाग यांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी ग्रामीण भागातील व शहरी भागातील प्राथमिक आरोग्यकेंद्रे, उपकेंद्रे, प्राथमिक व माध्यमिक शाळा, अंगणवाडी, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय या सर्व ठिकाणी लस मोफत दिली जाणार आहे. या ठिकाणी कार्यरत असणारे सर्व अधिकारी, कर्मचारी, अशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांचा सहभाग नोंदविला जाणार आहे. या लसीकरण मोहिमेसाठी 15 तालुक्यांमध्ये 288 उपकेंद्रे, 1964 गावे, 1788 आशा स्वयंसेविका, 2910 अंगणवाडी कार्यकर्ते, आणि शाळेमधील 3771 शिक्षक, तसेच 311लस टोचक आणि 155 टीम तयार करण्यात आली आहे. अशा पद्धतीने नियोजन करण्यात आलेले आहे. तरी या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बाष्टेवाड यांनी केले आहे.

# पडघा ग्रामसभेत नागरी समस्यांवर चर्चा

## रविंद्र विशे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसचीवालय सभागृहात बैठक संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या व चांगले उत्पन्न असलेल्या पडघा ग्रामपंचायतीचा ग्रामसभेत विवीध प्रमुख नागरी समस्यावर चर्चा करण्यात आली.

२६ जानेवारी तहकूब झालेली ग्रामसभा २२ फेब्रुवारी रोजी सरपंच रविंद्र विशे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयासंदर्भात ग्रामसचीवालय सभागृहात शनिवारी घेण्यात आली.यावेळी गावातील कचरा, गटारी स्वच्छ होत नाही, जवाहर रोजगार हमी योजनेंतर्गत व दारिद्र्य रेषेखालील नागरीकांना दीलेले व्यापारी गाळे लाभार्थी मयत झाल्यानंतर ग्रामपंचायतीकडे जमा करून घेणे, गुरचरण जागा मोजणी करून ताब्यात घेणे, बस स्थानक परिसरात होत असलेली वाहतुक कोंडी, भुयारी गटाराच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने गणेश नगर येथे दुर्गधीं येत असलेबाबत, सार्वजनिक विहीरी स्वच्छता, नवीन पाणीपुरवठा योजनेच्या निधीतील रक्कम ठेकेदाराला अदा केलेबाबत, परीसरातील उद्योग धंद्यामध्ये स्थानिकांना रोजगाराबाबत पत्रव्यवहार करणे, अंगणवाडी बांधकाम, बाजार पेठ ते लेंडी पुल गटार तुबुंन दुर्गंधी येत असल्याबद्दल, मच्छर प्रतिबंधक फवारणी करणे. हे प्रश्न नागरीकांनी उपस्थित करुन समस्यांचा पाढा वाचला. तसेच मंजुर झालेल्या घरकुल योजनेच्या २२ लाभार्थ्यांना यावेळी घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच निता दास ग्रामपंचायत सदस्य शैलेश बिडवी, अभिषेक नागावेकर, मयूरेश गंधे, सायली पाटील, नयना जाधव, अलका मोरे व ५४ नागरीक उपस्थीत होते तर सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे यांनी काम पाहिले.

# 'क्यूरियस माइंड' शैक्षणिक प्रदर्शन






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आर. बी. कारिया इंग्लिश स्कूल मध्ये "क्यूरियस माइंड" ही शैक्षणिक प्रदर्शनी यशस्वीपणे पार पडली. या प्रदर्शनीचे निरीक्षण मुख्याध्यापिका दिपाली राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. तसेच बिजीईएसच्या पदाधिकाऱ्यांच्या मोलाच्या पाठिंब्याने व प्रेरणेने हे आयोजन अधिक यशस्वी झाले. हा उपक्रम समाकलित शिक्षण आणि विषयांचे परस्पर संबंध या संकल्पनेवर आधारित होता, जिथे विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेचा आणि उत्साहाचा परिचय दिला. विविध प्रकल्पांद्वारे त्यांनी विषयांमधील सुसंगती दाखवून आपल्या सखोल समजुतीची प्रचिती दिली.

या कार्यक्रमात पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या प्रयत्नांचे भरभरून कौतुक केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उत्तम दिशा मिळाली, त्यामुळे प्रदर्शनी अत्यंत यशस्वी ठरली.


# केडीएमसी क्षेत्रातील शिक्षकांचे शिक्षक क्षमता वृद्धी २.० प्रशिक्षण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,ठाणे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने शासन निर्देशानुसार ४ टप्प्यांमध्ये शिक्षक क्षमता वृद्धी २.० प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १७ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) दुसऱ्या टप्प्यातील २५% शिक्षकांचे प्रशिक्षण उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाले. शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रम अधिकारी अर्चना जाधव, विस्तार अधिकारी माधुरी आयनोर व मारूती जाधव यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे प्रशिक्षण वर्ग टिटवाळा विभागातील रवींद्र विद्यालय व विद्यामंदिर मांडा येथे घेण्यात आले. सुलभकांच्या माध्यमातून आनंददायी वातावरणात प्रशिक्षण मिळत असल्याचे अभिप्राय शिक्षकांनी व्यक्त केले तसेच सदर प्रशिक्षणाचा उपयोग वर्ग अध्यापन प्रभावी करण्यासाठी करता येईल असे मत प्रशिणार्थींनी व्यक्त केले.

इयत्ता १ ते ५ साठी सुलभक म्हणून सुहास पाटील, जगन्नाथ शिंदे, सुनील दांडेकर ,कामिनी पाटील, नवीन शिंदे अपर्णा हर्षे, संदीप व्यवहारे इयत्ता ६ ते ८ साठी सुलभक म्हणून राजेंद्र दळे, संतोष पाटील, विलास झुंजारराव, चंद्रमणी सरदार, आशिष पाटील, महेश माळी तर माध्यमिक ९ ते १२ साठी कैलाश पाटील, निलेश उगले, श्रद्धा जोशी, वर्षा पाटील,अमिता पाठक यांनी सुलभक म्हणून मार्गदर्शन केले. प्रशिक्षण समन्वयक म्हणून प्राथमिक साठी विषयतज्ञ प्रदीप भोईर तर माध्यमिक साठी विषयतज्ञ राजू शेप यांनी कामकाज पाहिले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024